नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १४४ Issue - 144 | वार रविवार दि. १२ ऑक्टोबर २०२५ Blow- Sunday Date 12 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या

### पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी उबाठाचा हंबरडा मोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




मुंबई : शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या, या मागणीसाठी ठाकरेंची शिवसेना आज रस्त्यावर उतरली. छत्रपती संभाजीनगरमध्ये पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी हंबरडा मोर्चा काढण्यात आला. माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे देखील मोर्चात सहभागी झाले. यावेळी उद्धव ठाकरेंनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

उद्धव ठाकरे म्हणाले की, पंधरा दिवसांपूर्वी मी मराठवाड्यात आलो होतो. शेतकऱ्यांना भेटलो तेव्हाच मी जाहीर केलं जोपर्यंत हे सरकार कर्जमाफी करत नाही, तोपर्यंत या सरकारला आम्ही सोडणार नाही. गेल्या वेळेला आलो तेव्हा पाऊस होता, यावेळी आलो तेव्हा कडक ऊन आहे. इतर वेळेला शिवसेना तुमच्यासोबत आहेच पण ज्यावेळेस तुमच्यावर संकट येईल त्यावेळेस शिवसेना तुमच्या खांद्याला खांदा लावून सोबत आहे. हेक्टरी ५० हजार रुपयांच्या मदतीची मागणी शेतकऱ्यांशी बोलूनच केली आहे. सरकारने जाहीर केलेले पॅकेज शेतकऱ्यांना अमान्य आहे. सरकारचे पॅकेज ही मोठी थाप असून स्वतःचीच पाठ खाजवून घेत आहेत, थोपटून घेत आहेत, असा हल्लाबोल त्यांनी केला.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, पन्नास हजार रुपये हेक्टरी आपण कोणाकडे मागत आहोत तर ५० खोके ज्यांनी घेतले आहे त्यांच्याकडे मागत आहोत. त्यामुळे ते सहजासहजी वठणीवर येणार नाहीत. तुम्हला चाबूक हातात घ्यावा लागेल आणि यांना बरोबर वठणीवर आणावे लागेल. पॅकेज पाहिल्यावर सगळ्यांना असं वाटलं की इतिहासातलं सर्वात मोठं पॅकेज आहे. पण नाही ही इतिहासातली सर्वात मोठी थाप आहे. आजपर्यंत इतकी मोठी थाप कोणत्याही सरकारने मारलेली नाही. इतकी मोठी थाप देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने मारलेली आहे. काल, परवा देशाचे पंतप्रधान मुंबईत येऊन गेले. त्यांच्या भाषणामध्ये शेतकऱ्यांबद्दल काही उल्लेख होता का? ज्या पंतप्रधानांना आपण जिथे चाललो आहोत तिथली परिस्थिती माहित नाही तर आपण त्यांच्याकडे काय न्याय मागत आहोत? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

कैलास तुम्ही जे म्हणालात राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला. पण आता एका क्षेत्र शेतकऱ्याने सांगितले की, साहेब हातात टरबूज दिला. ही शेतकऱ्यांची थट्टा चाललेली आहे. मी या सरकारने जाहीर केलेल्या पॅकेजचे समर्थन करायला तयार आहे. पण माझी एक अट आहे. मुख्यमंत्री बोललेत खरडून गेलेल्या जमिनीला पर हेक्टरी मनरेगातून साडेतीन लाख रुपये देणार आहोत. मग मी मुख्यमंत्र्यांना आव्हान देतोय की, तुमची नियत असेल तर दिवाळीपूर्वी तीन लाखातील एक लाख रुपये माझ्या शेतकऱ्यांच्या अकाउंटमध्ये जमा करा, असे आव्हान उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले.

तुम्हाला राजकारण करण्यासाठी शेतकऱ्यांची मतं हवी आहेत. शेतकऱ्यांच्या मतावर तुम्ही सरकार आणता. शेतकऱ्यांच्या मतावर तुम्ही राजकारण करतात. मग शेतकऱ्यांनी न्याय हक्क मागितला तर तुम्ही म्हणतात त्याचे राजकारण नाही. हे कुठलं सरकार आहे? कर्जाचे पुनर्गठन करणार असे सांगितले. आम्हाला हे पुनर्गठण नको आहे. आजचं मरण उद्यावर नको. आम्हाला कर्जमुक्ती पाहिजे आहे. मुख्यमंत्री बोललेत की, यांना अधिकार काय? परंतु मला अधिकार आहे. कारण मी मुख्यमंत्री असताना कर्जमुक्त करून दाखवलं होतं. सरकारला आम्ही इशारा देत आहोत जर तुम्ही कर्जमुक्त केली नाही तर आम्ही फक्त मराठवाडा नाही तर आम्ही संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी रस्त्यावर उतरवून तुमचा विरोध केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा देखील उद्धव ठाकरेंनी दिला. तर कर्जमुक्ती पाहिजे म्हणजे पाहिजे, अशी मागणी देखील त्यांनी यावेळी केली.

## मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गेल्या दोन महिन्यांपासून राज्यभरात विशेषतः मराठवाड्यात पावसाने पूर परिस्थिती निर्माण केली. नंतर अरबी समुद्रात 'शक्ती' चक्रीवादळ सक्रिय झाल्याने पावसाने ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत मुक्काम वाढवला. आता राज्यातून मान्सून परतण्यास सुरुवात झाली आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, पुढील दोन ते तीन दिवसात राज्यभरातून मान्सूनचा परतीचा प्रवास पार पडेल.

**महाराष्ट्रातून येत्या दोन दिवसांत पाऊस माघारी फिरणार**

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार मान्सूनच्या परतीची रेषा अलिबाग, अहिल्यानगर, अकोला, जबलपूर, वाराणसी आणि रक्सौल या मार्गांमधून जात आहे. म्हणजेच राज्यातील विविध भागातून हळूहळू मान्सून माघारी फिरेल अशी शक्यता वर्तवली जात आहे.

मुंबईसह कोकण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातून मान्सूनचा पाऊस हळूहळू कमी होत असल्याचे दिसून आले आहे. हवामान तज्ञांच्या म्हणण्यानुसार मान्सूनच्या परतीच्या या प्रवासामुळे काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस अजूनही होऊ शकतो. परंतु एकूणच राज्यात हवामान उबदार आणि आर्द्रता कमी होण्यास सुरुवात होईल. हवामान विभागाच्या अंदाजानुसार गेल्या आठवड्यात तयार झालेल्या शक्ती चक्री वादळाची तीव्रता कमी झाली आहे .त्यामुळे कमी दाबाचा पट्टा विरला आहे .

यंदा ठरलेल्या वेळेच्या आठवडाभर आधीच सुरू झालेला नैऋत्य मौसमी पाऊस २४ मे रोजी केरळमध्ये दाखल झाला. त्यानंतर दोन आठवडे आधीच तो महाराष्ट्रात पोहोचला. जून आणि जुलै महिन्यांमध्ये पावसाचे प्रमाण कमी होतं मात्र ऑगस्ट सप्टेंबर महिन्यामध्ये झालेल्या मुसळधार पावसाने आणि त्यानंतर बंगालच्या उपसागरात झालेला कमी दाबाचा पट्टा आणि अरबी समुद्रात तयार झालेले शक्ती चक्रीवादळ यामुळे मान्सूनच्या परतीचा प्रवास लांबला होता. आता हवामान विभागाने परतीचा पाऊस लवकरच सुरू होईल असा अंदाज वर्तवला आहे.

गुजरात मध्य प्रदेश उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातील काही भागांमधून पुढील २४ तासात मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात होऊ शकते असा अंदाज हवामान विभागाने वर्तवलाय .

पुढील दोन ते तीन दिवसात राज्यातून मान्सून माघारी फिरेल अशी शक्यता वर्तवली जात आहे. पुढील पाच दिवस राज्यभरात कोणत्याही जिल्ह्यात पावसाचे अलर्ट देण्यात आलेले नाहीत. प्रादेशिक हवामान केंद्राच्या अंदाजानुसार पुढील ४८ तासात कमाल तापमानात दोन ते तीन अंशांनी वाढ होणार आहे.

## घराचा उंबरठा न ओलांडणारे आता हंबरडा फोडताहेत, एकनाथ शिंदेंची उद्धव ठाकरेंवर टीका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मला फक्त बाळासाहेब ब्रँड माहिती आहे, इतर कोणताही ब्रँड माहिती नाही, महापालिका निवडणुकीत महायुतीलाच यश मिळेल असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. कधी घराचा उंबरठा न ओलंडणारे आता हंबरडा फोडत आहेत. जेव्हा द्यायची वेळ होती तेव्हा आमचे हात रिकामे आहेत-रिकामे आहेत असंच यांचं सुरू होतं असा टोला एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना लगावला.



राज्यातील शेतकरी संकटात आहे, त्यांच्या डोळ्यात अश्रू आहेत, या वेळेस कोणी राजकारण करू नये असं आवाहन एकनाथ शिंदे यांनी केलं. एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या हंबरडा मोर्चावर जोरदार टीका केली.

उद्धव ठाकरे यांच्या हंबरडा मोर्चावर बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, यांना हे उशिरा सुचलेलं शहाणपण आहे. आम्ही शेतकऱ्यांच्या बांधा-बांधावर आम्ही जाऊन आलो. प्रत्यक्ष जाऊन तिथली परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यातले अश्रू आम्ही पाहिले आणि त्यावेळेस आम्ही ठरवलं की शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ राहायचं. म्हणून आम्ही एनडीआरएफचे निकष असतील, अटीशर्ती असतील त्या सर्व बाजूला ठेऊन मोठ्या प्रमाणात भरीव देण्याचं ठरवलं. शेतकऱ्यांच्या डोळ्यातले अश्रू पुसण्याचं काम आम्ही केलं याच मला समाधान आहे.

आम्ही ३२ हजार कोटींचं पॅकेज जाहीर केलं, आम्ही म्हणालो होतो की, शेतकऱ्यांची दिवाळी आम्ही काळी होऊन देणार नाही, दिवाळी पूर्वी त्यांच्या खात्यात पैसे जमा होऊ लागले आहेत. आम्ही ४७ हजार हेक्टरी मदत केली, जमीन खरडून गेलेल्या लोकांना पुन्हा मनरेगाच्या माध्यमातून ३ लाख रुपये हेक्टरी असे ३ लाख ४७ हजार रुपये मदत केली. आतापर्यंतच्या इतिहासात इतकी मदत शेतकऱ्याला कधीच मिळाली नव्हती.

शेतकऱ्यांची चिंता आम्ही मिटवली. हे करत आहेत ते निव्वळ राजकारण आहे. तुम्ही शेतकऱ्यांच्या बांधावर जाताना शेतकऱ्याच्या पोराच्या डोळ्यातले अश्रू पाहून त्याच्या हातात बिस्कीटचा पुडा तरी ठेवला का? आम्ही मोठं मोठे किट पाठवले, त्यांचा दसरा चांगला झाला,

दिवाळी ही त्यांची चांगली होईल हे आम्ही पाहिलं. हा कसला हंबरडा मोर्चा? हे उंबरठा न ओलांडणारे आता हंबरडा फोडायला लागलेत. सत्ता गेली तेव्हा हंबरडा फोडला, खुर्ची गेली तेव्हा हंबरडा फोडला. हे पुतणा-मावशीचं प्रेम आहे, हे निव्वळ शेतकऱ्यांच्या नावावर केलेले राजकारण आहे.

## संग्राम जगतापांची मुस्लिमविरोधी भूमिका मान्य नाही, कारणे दाखवा नोटीस पाठवणार; वादग्रस्त वक्तव्यावर अजित पवारांचा दम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राष्ट्रवादीचे आमदार संग्राम जगताप यांनी मुस्लिम समूदायाच्या भावना दुखावणारे वक्तव्य केल्यानंतर त्यावर अजित पवारांनी प्रतिक्रिया दिली. संग्राम जगतापांची भूमिका चुकीची आहे, त्यांना कारणे दाखवा नोटीस पाठवणार असल्याचं अजित पवारांनी स्पष्ट केलं. पक्षाच्या विचारधारेच्या वेगळी भूमिका मान्य नसल्याचंही ते म्हणाले.

दिवाळीची खरेदी फक्त हिंदू बांधवांकडूनच करा असं वादग्रस्त आवाहन राष्ट्रवादीचे अहिल्यानगरचे आमदार संग्राम जगताप यांनी केलं होतं. संग्राम जगताप यांनी या आधीही अनेकदा मुस्लिम विरोधी भूमिका घेतली होती. त्यावर अजित पवारांनी या आधीही समज दिली होती. त्यानंतर आताही तशाच प्रकारचं वक्तव्य जगतापांनी केलं.

संग्राम जगताप यांनी केलेल्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना अजित पवार म्हणाले की, संग्राम जगताप यांनी केलेले वक्तव्य चुकीचं आहे. आम्ही त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावणार आहोत. एकदा का पक्षाचं ध्येयधोरण ठरलं तर पक्षाच्या विचारधारेपासून वेगळी भूमिका घेत कुठलाही खासदार-आमदाराने किंवा नेता असे बेजबाबदार वक्तव्य करत असेल तर ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला आजिबात मान्य नाही. तशी आमची भूमिका कालही होती, आजही आहे आणि भविष्यातही राहणार.



सोलापुरातील हिंदू आक्रोश मोर्चात बोलताना संग्राम जगताप म्हणाले होते की, दीपावली सणाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकांनी खरेदी फक्त हिंदू लोकांच्याच दुकानातून करावी. आपल्या दीपावली खरेदीचा नफा केवळ हिंदू लोकांनाच मिळायला हवा. सध्या हिंदू मंदिरात अथवा हिंदूंवर होणारे हल्ले हे मशिदीमधून घडत आहेत. गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादीचे आमदार संग्राम जगताप यांनी प्रखर हिंदुत्ववादी भूमिका घेतल्याचं दिसत आहे. त्यातून ते सातत्याने मुस्लिम विरोधी वक्तव्य करताना दिसतात. त्यामुळे राष्ट्रवादीतील अनेकजण त्यांच्यावर नाराज आहेत.

पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी ही नाराजी अजित पवारांपर्यंत पोहोचवली आहे. अजित पवारांनीही संग्राम जगताप यांना वेळोवेळी समज देण्याचा प्रयत्न केला, मात्र जगताप आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. सोलापुरातील हिंदू आक्रोश मोर्चामध्ये बोलताना त्यांनी मुस्लिम विरोधी वक्तव्य केल्याने मुस्लिम समाजही नाराज झाल्याचं दिसून येतंय.

संग्राम जगताप यांचे सासरे शिवाजी कर्डिले भाजपचे विद्यमान आमदार आहेत. त्यामुळे अजित पवारांनी जरी कारवाई केली तरी जगतापांना भाजपची वाट मोकळी असल्याचं चित्र आहे. कदाचित त्यामुळेच संग्राम जगताप हे उघड-उघड हिंदुत्ववादी भूमिका घेताना दिसत आहेत अशी राजकीय चर्चा सध्या सुरू आहे.

पक्षाच्या विचारसरणीविरोधात कोणत्याही आमदार-खासदाराने भूमिका घेतल्यात ती मान्य नसल्याचं अजित पवारांनी म्हटलंय. त्यामुळे संग्राम जगतापांवर आता काय कारवाई होते हे पाहावं लागेल.

### २५१ तालुके पूर्णतः तर ३१ तालुके अंशतः आपत्तीग्रस्त म्हणून घोषित

### शेती, घरे, जनावरे, मत्स्यव्यवसाय, पायाभूत सुविधा दुरुस्तीस मोठा दिलासा

## आपत्तीग्रस्त तालुक्यांसाठी विशेष मदत पॅकेज, सवलती लागू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील; आपत्तीग्रस्त तालुक्यातील बाधितांना दुष्काळ सदृश परिस्थितीत लागू असणाऱ्या सवलती; शासन निर्णय निर्गमित

मुंबई, दि. ११ : राज्यात जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी, पूर आणि विविध नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या मोठ्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने २५१ तालुके पूर्णतः तर ३१ तालुके अंशतः आपत्तीग्रस्त/अतिवृष्टीग्रस्त म्हणून घोषित करून आपत्तीमुळे बाधितांना विशेष मदत पॅकेज आणि विविध सवलती लागू केल्या आहेत. तसेच आपद्ग्रस्त तालुक्यातील बाधितांना दुष्काळ सदृश परिस्थितीत लागू असणाऱ्या सवलती देण्यास मान्यता देण्यात आली आहे. या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

अतिवृष्टी व पुरामुळे शेतीपिकांचे नुकसान, शेतजमीन वाहून जाणे, घरांची पडझड, जनावरांची हानी आणि मालमत्तेचे नुकसान झाले आहे. या सर्व आपद्ग्रस्तांना तातडीने दिलासा मिळावा म्हणून राज्य शासनाने हे विशेष पॅकेज लागू केले आहे. या विशेष पॅकेजमुळे बाधित पिके, शेती, घरे, जनावरे, मत्स्यव्यवसाय, पायाभूत सुविधा दुरुस्तीस मोठा दिलासा मिळणार असल्याचा विश्वास मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-



पाटील यांनी व्यक्त केला.

जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे बाधित २५१ पूर्णतः व ३१ अंशतः बाधित तालुक्यातील बाधित पिकांचे तातडीने पंचनामे करण्यात आले. जून ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत २६.६९ लाख हेक्टर तर सप्टेंबर २०२५ मध्ये जवळ जवळ ३९ लाख हेक्टर अशा सुमारे ६५ लाख हेक्टर क्षेत्रावरील शेत पिकांचे नुकसान झाले असल्याचेही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.

आर्थिक साहाय्य - आपद्ग्रस्त मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना रुपये चार लाख, अवयव अथवा डोळे निकामी झाल्यास ४० ते ६० टक्के अपंगत्व आल्यास रुपये ७४ हजार, ६० टक्के पेक्षा अधिक अपंगत्व आल्यास २ लाख ५० हजार, जखमी व्यक्ती रूग्णालयात एक आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी दाखल झाला असल्यास १६ हजार, एक आठवड्यापेक्षा कमी कालावधीसाठी दाखल असल्यास ५ हजार ४०० रुपये.

घरांसाठी मदत - पूर्णतः नष्ट झालेल्या पक्क्या /कच्च्या घरांसाठी-सपाट भागातील प्रती घर रुपये १ लाख २० हजार तर डोंगराळ भागातील घरांसाठी १ लाख ३० हजार, अंशतः पडझड झालेल्या घरांसाठी (किमान १५ टक्के) पक्क्या घरांसाठी प्रती घर ६ हजार ५०० रुपये, कच्च्या घरांसाठी प्रती घर चार हजार रुपये, प्रती झोपडी आठ हजार रुपये, प्रती गोठा तीन हजार रुपये.

मृत जनावरांसाठी - दुधाळ जनावरांसाठी प्रती जनावर ३७ हजार ५०० रुपये, ओढकाम करणाऱ्या जनावरासाठी प्रती जनावर ३२ हजार रूपये, लहान जनावरासाठी प्रती जनावर २० हजार रूपये, शेळी मेंढी प्रती जनावर चार हजार रुपये आणि प्रती कोंबडी १०० रुपये.

शेतीपिकांचे नुकसान - प्रति हेक्टर ८ हजार ५०० रुपये (तीन हेक्टर मर्यादेत), आश्वासित सिंचनाखालील (बागायत) पिकासाठी प्रती हेक्टर १७ हजार (तीन हेक्टर मर्यादेत), आणि बहुवार्षिक पिकांसाठी प्रती हेक्टर २२ हजार ५०० रुपये (तीन हेक्टर मर्यादेत).

शेतजमीन नुकसान - नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतजमिनीवरील गाळ काढणे प्रती हेक्टर १८ हजार रुपये आणि दरड कोसळणे/ जमीन जमीन खरडणे, खचणे व नदीपात्र प्रवाह बदलल्यामुळे शेतजमीन वाहून जाणे यासाठी केवळ अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना प्रती हेक्टर ४७ हजार रुपये मदत देण्यात येणार आहे.

मत्स्य व्यवसाय - मत्स्य व्यावसायिकांना बोटींची दुरुस्ती, जाळी यासाठी बोटींची अंशतः दुरुस्ती सहा हजार रुपये, पूर्णतः नष्ट झालेल्या बोटींसाठी (पान २ वर...)

# जागतिक सामाजिक प्रगती निर्देशांक २०२५: भारत ९९ व्या स्थानावर!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सामाजिक प्रगती निर्देशांक (डेळळरश्र झीसीर्शीी खपवशु - डझख) हे एक व्यापक आणि प्रभावी मापन साधन आहे, जे देशातील आर्थिक प्रगतीसह सामाजिक, पर्यावरणीय आणि वैयक्तिक जीवनाच्या स्तरावर आधारित कामगिरीचे सर्वसमावेशक मूल्यांकन करते. या निर्देशांकाद्वारे देशातील नागरिकांना मिळणाऱ्या सामाजिक सेवांचा, मूलभूत गरजा पूर्ण होण्याचा आणि संधी व समतेचा आढावा घेतला जातो. सामाजिक प्रगती केवळ आर्थिक वृद्धीपर्यंत मर्यादित नसून, शाश्वत विकास आणि लोकांच्या जीवनमान सुधारण्यासाठी अत्यंत आवश्यक मानली जाते. जगभरातील १६७ देशांच्या तुलनेत भारताने २०२५ मध्ये या निर्देशांकात ९९ वा क्रमांक मिळवला आहे, जो मागील वर्षीच्या १०९ व्या स्थानापेक्षा स्पष्ट प्रगती दर्शवतो. भारताचा या निर्देशांकातील स्कोअर ५८.३ आहे, ज्यामुळे तो 'टियर ४' श्रेणीत मोडतो, याचा अर्थ असा की देशाने काही प्रमाणात प्रगती केली असली तरी अजूनही सुधारणा आणि प्रयत्नांची आवश्यकता आहे.

सामाजिक प्रगती निर्देशांकाचे मूलभूत मापन तीन प्रमुख घटकांवर आधारित आहे. पहिला घटक म्हणजे 'मूलभूत मानवी गरजा', ज्यात आरोग्य, स्वच्छता, सुरक्षितता, निवारा आणि पोषण यासारख्या गरजांची पूर्तता कितपत प्रभावीपणे होत आहे, हे मोजले जाते. भारताने या क्षेत्रात चांगली कामगिरी केली आहे. स्वच्छ भारत अभियानामुळे सार्वजनिक जागांमध्ये स्वच्छतेचा स्तर सुधारला आहे, राष्ट्रीय पोषण मोहिमांमुळे मुलांच्या पोषण स्थितीत सुधारणा झाली असून बालमृत्यू दरात घट झाली आहे, तसेच आरोग्य सेवांमध्ये वाढ झाल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध होत आहेत. तथापि, ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये अजूनही स्वच्छता आणि आरोग्य सेवांमध्ये असमानता मोठ्या प्रमाणात दिसून येते. काही भागांमध्ये प्राथमिक आरोग्य सेवा पुरेशी उपलब्ध नाहीत, पाणी आणि स्वच्छतेची सोय अपुरी आहे, ज्यामुळे समाजातील मूलभूत गरजांची पूर्तता अजूनही सुधारण्याची आवश्यकता आहे.

दुसरा घटक म्हणजे 'सामाजिक व वैयक्तिक कल्याण', ज्यामध्ये शिक्षण, आरोग्य सेवा, आणि नागरिकांचा सामाजिक सहभाग यांचा समावेश होतो. भारताने या क्षेत्रातही प्रगती साधली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीतून विद्यार्थ्यांना गुणवत्तापर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली आहे. यामुळे नवोदित विद्यार्थ्यांना संशोधन, नवोन्मेष आणि कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध होत आहेत. आरोग्य क्षेत्रातही डिजिटल हेल्थ सेवा, टेलिमेडिसिन आणि दूरस्थ आरोग्य सुविधा ग्रामीण भागांपर्यंत पोहोचत आहेत. मात्र, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील गुणवत्तेचा अंतर अजूनही कायम आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मूलभूत सुविधा अपुर्या आहेत, शिक्षक आणि शिक्षण संसाधने काही भागांत मर्यादित आहेत. तसेच, नागरिकांच्या सामाजिक सहभाग आणि समुदायातील सहभागाच्या बाबतीतही काही प्रमाणात अपूर्णता आहे, ज्यामुळे सामाजिक समृद्धी पूर्णपणे साधली गेली नाही.

तिसरा घटक म्हणजे 'सामाजिक संधी', ज्यामध्ये देशातील आर्थिक, शैक्षणिक आणि पर्यावरणीय संधीचा समावेश होतो. या घटकात सामाजिक समानता, न्याय व पारदर्शकतेचीही मोजणी होते. भारताने महिला सशक्तीकरणासाठी 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ' सारख्या योजनांचा अवलंब करून मोठी कामगिरी केली आहे. आर्थिक क्षेत्रात युवकांसाठी कौशल्य विकासावर भर दिला जातो, ज्यामुळे रोजगाराच्या संधी वाढतात. तरीसुद्धा, शिक्षण, रोजगार आणि जीवनसुविधांमध्ये असमानता काही भागांत कायम आहे. विशेषतः महिला, अल्पसंख्याक समुदाय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गासाठी अजूनही सुधारणा आवश्यक आहे. पर्यावरणीय बाबतीतही राज्य आणि केंद्र सरकारच्या पातळीवर प्रयत्न सुरू आहेत; परंतु प्रदूषण नियंत्रण, जलसंवर्धन, वनक्षेत्राचे संरक्षण आणि जलवायू बदलाचे परिणाम यावर अजून अधिक कार्य करण्याची आवश्यकता आहे.

भारताने सामाजिक प्रगती निर्देशांकाच्या सुधारणेत अनेक योजना राबवल्या आहेत, ज्यांनी देशाच्या सामाजिक आरोग्याला व समृद्धीला हातभार लावला आहे. स्वच्छ भारत अभियानामुळे सार्वजनिक जागांमध्ये स्वच्छतेचा स्तर उंचावला आहे, राष्ट्रीय पोषण मोहिमांमुळे बाल पोषण सुधारले आहे आणि बालमृत्यू दर घटला आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाने विद्यार्थ्यांना गुणवत्तापर्यंत पोहोचण्याची संधी दिली आहे, तर डिजिटल भारत मोहिमेमुळे शिक्षण, आरोग्य सेवा व सरकारी सेवा अधिक सुलभ व लोकांपर्यंत पोहोचणाऱ्या बनल्या आहेत. याशिवाय, कौशल्य विकास योजना, महिला सशक्तीकरण मोहिमा, आणि सामाजिक न्यायाच्या उपाययोजनांमुळे सामाजिक सुधारणेची गती वाढली आहे.

मात्र, सुधारणा असूनही काही आव्हाने अजूनही ताजी आहेत. ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये आरोग्य सेवा व शिक्षणाच्या सुविधेत मोठा अंतर आहे. मूलभूत पायाभूत सुविधा, जसे की स्वच्छ पाणी, विद्युतपुरवठा, आणि शौचालयांची उपलब्धता काही भागांत अपुरी आहे. महिला सशक्तीकरण पूर्णपणे साधलेले नाही, समाजातील काही वर्ग अजूनही वंचित आहेत, तसेच पर्यावरणीय आव्हाने, प्रदूषण आणि जलवायू बदलाचे परिणाम यावर अजून काम करणे गरजेचे आहे. या सर्व मुद्द्यांवर लक्ष न दिल्यास सामाजिक प्रगतीचे संपूर्ण उद्दिष्ट पूर्ण होऊ शकणार नाही.

सामाजिक प्रगती निर्देशांक हे फक्त आकडेवारी नाही तर देशाच्या सामाजिक स्वास्थ्याचे दर्पण आहे. या निर्देशांकाद्वारे सरकार, सामाजिक संस्था, उद्योग आणि नागरिकांना योग्य धोरण आखण्यात मदत होते. देशातील मूलभूत सुविधा, सामाजिक न्याय आणि समतेसाठी हे एक प्रभावी साधन आहे. या निर्देशांकावरून जागतिक समाजाच्या तुलनेत भारताची कामगिरी समजून घेता येते आणि आवश्यक ती सुधारणा करता येते. यामुळे भारताला अधिक समावेशक, टिकाऊ आणि समतोल विकासासाठी मार्गदर्शन मिळते.

भविष्यातील दृष्टीकोन लक्षात घेता, भारताने सामाजिक प्रगती निर्देशांकाच्या आधारावर शिक्षण, आरोग्य, महिला सशक्तीकरण, पर्यावरणीय संवर्धन व सामाजिक न्याय यावर अधिक लक्ष केंद्रित करावे. ग्रामीण भागांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे, नागरिकांचे सामाजिक सहभाग प्रोत्साहित करणे, हरित तंत्रज्ञानाचा उपयोग करणे आणि जीवनमान सुधारण्यासाठी नवे कार्यक्रम राबवणे यावर भर द्यावा लागेल. नागरिकांचा सक्रिय सहभाग, जागरूकता आणि सहकार्यामुळे सामाजिक सुधारणेची गती वाढेल आणि देश अधिक समृद्ध व समतोल समाजाकडे वाटचाल करेल.

सामाजिक प्रगती निर्देशांकामध्ये भारताची सुधारित स्थिती देशाच्या सामाजिक आरोग्य व समृद्धीसाठी आशादायी आहे. यामुळे भारत भविष्यात जागतिक सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात अधिक महत्त्वाचा केंद्रबिंदू बनेल. देशाचा कल्याणकारी, समृद्ध आणि समतोल समाज उभारण्यासाठी हे निर्देशांक बलवान साधन ठरेल. योग्य धोरणे, सखोल अभ्यास आणि समर्पित प्रयत्नांमुळे भारत सामाजिक आरोग्याच्या आणि टिकावू विकासाच्या दिशेने स्थिरपणे वाटचाल करत राहील, याची खात्री देता येईल.

**- डॉ. भारत कऱ्हाड**
**प्राचार्य, वराडकर महाविद्यालय, दापोली, जिल्हा रत्नागिरी**

# शाहीर रामदास रामटेके कलावंत मानधनापासून वंचित...!

**कलाकारांवर उपासमारीची वेळ : तीन वर्षांपासून मानधन सुरू नाही**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी / बाराभाटी : जवळच्या बोंडगाव येथील खडीगंमत व तमाशा शाहीर रामदास रामटेके यांनी तीन वर्षांपूर्वी कलावंत मानधन मिळण्यासाठी अर्ज करुन फाईल समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद गोंदिया येथे सादर केली आहे. परंतु अजून ही या योजनेचा लाभ सदर कलावंताना मिळाला नाही. हे मात्र मोठे दुर्दैव म्हणावे लागेल. ही विभागाची मोठी शोकांतिका आहे.

रामदास रामटेके हे ६६ वर्षाच्या वयाचे असून त्यांनी जवळपास तीस वर्षपेक्षा अधिक काळ तमाशा फळात शाहीर म्हणून काम केले आहे. तसेच खडीगंमत लोककला या कला प्रकारात सुद्धा त्यानी शाहीर कलावंत अशी महत्त्वाची भूमिका साकारुन कलेला जीवंत ठेवले आहे. हे प्रसंशनीय बाब आहे.

आजवर त्यांनी पाचशेच्यावर कार्यक्रम सादरीकरण केले. संपूर्ण विदर्भातील जिल्ह्यात, तालुक्यात तसेच गावगाडातही आपल्या कलेची छाप आजही सोडली आहे. आजही ते सादरीकरण करतात.

कलाकारांवर उपासमारीची वेळ

रंगभूमी व लोकनाट्य या क्षेत्राची तीस वर्षपेक्षा अविरत सेवा करुनही समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद गोंदिया यांच्या कडून मानधन मिळते नाही. ही किती गंभीर बाब म्हणावी प्रशासनाची... काय करावे मग कलावंतानी... टु बी आर नाट टु बी.....

कलावंतांच्या कलेची प्रशासन दखल घेत नाही.

गेल्या तीन वर्षांपासून सर्व दस्ताऐवज एकत्रित करून फाईल तयार केली. अर्ज करुन सादर केले आहे. ती फाईल धुळ खात असते. विभागाचे कर्मचारी लक्ष देत नाही. कलाकार चकरा मारुन चप्पल झीजवतात. अशाप्रकारे कलावंतासोबत घडत आहे. समिती ही आपआपल्या जवळच्या कलाकारांची कामे करतात. बाकीचे नाही.

तीन वर्षांपासून फाईल सादर केली. १०-१५ चकरा मारल्या पण कर्मचारी काही सांगत नाही. कधी खुर्च्या रिकाम्या असतात. मग कलावंतानी कशा रितीने जगावे.

-रामदास रामटेके, तमाशा व खडीगंमत शाहीर,

कलावंतांच्या कलेसोबत कलाकारांच्या जीवाची हमी घ्यावी. कलाकार जगला पाहिजे. तर कला जीवंत राहील. पण शासन हे जीवावर बसते आहे. ही खंत कलाकारांची आहे.

# जि प निवडणूकीच्या सारीपाटावर नवा आश्वासक चेहरा प्रवीण गीते

**कृतिशील विचारांचे गतीशील नेते.**
**प्रवीण गीते हा नारा गाजतोय..!**
**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : स्थानिक स्वराज्य संस्था या ग्रामीण भागातील व्यवस्थेला गतिमान करण्यासाठी निमर्ाण झाले असून पंचायत राज च्या माध्यमातून या संस्था अधिक भक्कमपणे व प्रभावीपणे काम करावे असा हेतू मागील काळात अनेक महान व्यक्तिमत्त्वांनी ठेवला होता.या व्यवस्थेवर अंकुश ठेवण्यासाठी लोकल बॉडी ची निर्मिती करण्यात आली होती. त्याचाच भाग म्हणून आपण आपल्या भागातील प्रतिनिधी या व्यवस्थेवर पाठवून आपल्या विकासाच्या वाटा मजबूत करीत असतो. पण गेल्या अनेक दिवसापासून या ठिकाणी आपण आपला प्रतिनिधी पाठवतो पण ग्रामीण गाव खेड्याची अवस्था आजही म्हणावी तशी नीटनेटकी नाही. गावातील जिल्हा परिषदेच्या शाळा म्हणाव्या तेवढ्या सुधारलेल्या दिसून येत नाही. आरोग्य केंद्रे,जनावराची दवाखाने याबाबतचे चित्र फारसं वेगळं दिसून येत नाही.अशी अवस्था का? व्हावी.. सामान्य माणूस हा निवडणूक आली की जागृत राहत नाही. त्याला निवडणुकीत जात,धर्म,पक्ष आधी बाबींचा तो विचार करतो आणि मग त्यांन दिलेल्या मताची पुढच्या काळात आपली फसवणूक झाली अशी त्याची अवस्था होते. पंचायत राज प्रणालीला अपेक्षित असलेल्या गोष्टीचं आपल्याच हातांनी हसे होताना तो पाहतो. पाश्चातापा शिवाय त्याच्याजवळ दुसरा काही मार्ग नसतो. म्हणून सामान्य माणूस या धोरणांवर प्रभावीपणे काम करणारा लोकप्रतिनिधी निवडणार नाही तोपर्यंत गावे सशक्त होणार नाही..



न्यायालयातील सगळे निकाल लागून पूर्ण झाल्यामुळे लवकरच स्थानिक स्वराज्य निवडणुका होऊ घातल्या आहे. त्या पार्श्वभूमीवर येत्या सोमवारी आरक्षण सोडत सुद्धा निघणार आहे. त्यामुळे अनेक उमेदवारांनी आपआपल्या मतदारसंघात दौरे आणि चाचपनी सुरू केली आहे..मागील काळातील तेच तेच नावे. तेच तेच घराणे यांना जनता आता कंटाळली असून लोकांमध्ये बदलाची प्रक्रिया दिसून येत आहे. त्या पार्श्वभूमीवर सामाजिक उत्तरदायित्वाची भूमिका निभावणारी लोक विचारधारेशी अधिष्ठान असलेली माणसे निवडणुकीच्या प्रक्रियेत आली पाहिजे अशी धारणा आता नव्या पिढीसह जुन्या जाणत्या बुजुर्गांची निर्माण झाली आहे. म्हणूनच कर्तुत्व वकृत्व आणि दातृत्व याचा संगम असलेलं व सत्तावीस वर्ष आपल आयुष्य चळवळीला समर्पित केलेलं व्यक्तिमत्व म्हणजे लोकजागर परिवाराच्या माध्यमातून अनेक गरजू आणि उपेक्षित लोकांना कामी येत त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचं काम ज्यांनी केलं ते लोकजागर परिवाराचे विश्वस्त प्रवीण गीते हे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आपली वाटचाल करणार आहेत. सामान्य माणसांच्या मनात आपल्या कार्यकर्तुत्वाच्या माध्यमातून घर करणारा हा माणूस असून, अशी माणसं राजकारणाचा चेहरा मोहरा बदलू शकतात असा विश्वास अनेकांना त्या ठिकाणी वाटत आहे. आजच्या गढूळ राजकारणाला स्वच्छ करण्यासाठी सामाजिक चळवळीतील लोक राजकारणात आले तरच ते शक्य आहे त्यामुळे प्रवीण गीते यांची दावेदारी नक्कीच मातृतीर्थाचा राजकीय सारीपाट बदलल्याशिवाय राहणार नाही असे वाटते.!

# आपत्तीग्रस्त तालुक्यांसाठी विशेष मदत पॅकेज, सवलती लागू

(पान १ वरून..) १५ हजार, अंशतः बाधित झालेल्या जाळ्यांच्या दुरुस्तीसाठी तीन हजार रुपये आणि पूर्णतः नष्ट झालेल्या जाळ्यांसाठी चार हजार रुपये मदत देण्यात येणार आहे.

इतर सवलती- नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित शेतकऱ्यांसाठी आणि नागरिकांसाठी सवलती लागू केल्या असून यामध्ये जमीन महसूलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस एक वर्षासाठी स्थगिती, तिमाही वीज बिलात माफी, परीक्षा शुल्कात माफी व १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांची फी माफी या सवलतींचा समावेश करण्यात आला आहे.या सवलतीबाबत योजनेचे स्वरूप व त्या बाबतच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना/आदेश संबधित प्रशासकीय विभागामार्फत निर्गमित करण्यात येणार आहेत.

कृषी विभाग - या रब्बी हंगामामध्ये शेतकऱ्यांना खते व बियाणे घेण्यासाठी प्रति हेक्टरी १० हजार प्रमाणे (तीन हेक्टरच्या मर्यादेत) मदत कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये थेटपणे जाईल याबाबत आवश्यक ती कार्यप्रणाली व निधी उपलब्धतेबाबत कार्यवाही कृषी विभागाने करावयाची आहे.

पशुसंवर्धन विभाग - मोठे पशुधन, लहान पशुधन व कुक्कुटपक्षी मृत पावलेले आहेत. याबाबत शासन निर्णय २७ मार्च २०२३ च्या निकष व दरानुसार मदत व पुनर्वसन विभागाकडून मदत दिली जाईल. याबाबतची कार्यवाही जिल्हास्तरावरुन प्रचलित निकषानुसार उपलब्ध असलेल्या उणे प्राधिकरण सुविधेनुसार तातडीने करावी. २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयाच्या निकषाबाहेरील (वाढीव पशुधन हानी) पशुधन हानीसाठीचे निकष शिथिल करण्यात येऊन जेवढे पशुधनाचे नुकसान झाले आहे त्या सर्व पशुधन हानीबाबत पशुसंवर्धन विभागामार्फत कार्यवाही करण्यात येणार आहे.

मत्स्यव्यवसाय - मच्छीमार जाळी, मत्स्यबीज, मत्स्य बोटींचे नुकसान झालेले आहे याबाबत शासन निर्णय २७ मार्च २०२३ च्या निकष व दरानुसार मदत व पुनर्वसन विभागाकडून मदत देण्यात येणार आहे. २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयातील निकषाबाहेरील (वाढीव मत्स्यबीज हानी, मच्छिमार जाळी) हानीसाठीचे निकष शिथिल करण्यात येऊन जेवढे मत्स्यबीज हानी व मच्छिमार जाळीचे नुकसानीबाबत मत्स्यव्यवसाय विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल.

रोजगार हमी योजना विभाग- अतिवृष्टी व पुरामुळे शेतकऱ्यांची शेतजमीन खरडून जाऊन झालेल्या नुकसानीसाठी शासन निर्णय दि.२७ मार्च २०२३ च्या निकष व दरानुसार मदत व पुनर्वसन विभागाकडून मदत दिली जाईल. या मदतीव्यतीरिक्त रोजगार हमी योजना विभागामार्फत शेतकऱ्यांच्या शेतजमिनी लागवडीयोग्य करण्यासाठी जास्तीत जास्त तीन लाख प्रति हेक्टर या मर्यादित व दोन हेक्टर पर्यंत पाच लाख मदत अनुज्ञेय राहणार आहे. तसेच अतिवृष्टी व पुरामुळे खचलेल्या व बुजलेल्या सिंचन विहिरी दुरुस्तीच्या कामासाठी प्रत्यक्ष खर्चास किंवा प्रती विहिर कमाल मर्यादा ३० हजार रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल ती लाभार्थ्यास अनुज्ञेय राहणार आहे. यासाठी रोजगार हमी योजना विभागामार्फत आवश्यक निधीबाबत कार्यवाही करण्यात येईल.

पायाभुत सुविधा- अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या ग्रामविकास, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, ऊर्जा या विभागांतर्गतच्या तातडीच्या व आवश्यक कामांसाठी रुपये १० हजार कोटीचे विशेष पॅकेज संदर्भात संबंधित विभागाने नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेने स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येणार आहे.

अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे प्रभावित / घोषित तालुक्यामध्ये जाहीर करण्यात आलेल्या उपाययोजना खरीप हंगाम २०२५ (जून ते ऑक्टोबर) साठी लागू राहतील. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन माहिती प्रणालीद्वारे (एनडीएमआयएस) शासनाने जाहीर केलेल्या मदतीच्या विशेष पॅकेज मधील योजना, उपक्रम / कामांची माहिती केंद्र शासनाच्या एनडीएमआयएस पोर्टलवर भरण्यात येणार आहे.

ई-केवायसी- ज्या शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक मध्ये नोंदणी होऊन ॲग्रीस्टकमध्ये ई-केवायसी झाली आहे अशा शेतकऱ्यांची माहिती डीबीटी प्रणालीवर भरलेल्या माहितीशी जुळत असलेल्यांना मदत मिळणे सुलभ व सुकर होण्यासाठी (डीबीटी द्वारे मदत वितरणासाठीच्या आवश्यक) ई-केवायसी प्रक्रियेपासून सूट देण्यात येत आहे.

**अतिवृष्टी व पुरामुळे पूर्णतः बाधित तालुके-**

पालघर :- पालघर, डहाणू, तलासरी, विक्रमगड (चार तालुके)

नाशिक- मालेगाव, निफाड, नांदगाव, सटाणा, दिंडोरी, सुरगाणा, नाशिक, त्र्यंबकेश्वर, पेठ, सिन्नर, चांदवड, येवला ( १२ तालुके)

जळगांव- एरंडोल, पारोळा, धरणगाव, पाचोरा, जामनेर, जळगाव, भडगाव, अमळनेर, रावेर, चाळीसगाव, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर (१३ तालुके)

अहिल्यानगर- अहिल्यानगर, शेवगाव, कर्जत, पाथर्डी, नेवासा, राहाता, श्रीरामपूर, जामखेड, राहुरी, श्रीगोंदा, कोपरगाव ( ११ तालुके)

सोलापूर- उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, पंढरपूर, मोहोळ, मंगळवेढा, माळशिरस, माढा, करमाळा, सांगोला ( ११ तालुके)

सांगली- मिरज, वाळवा, शिराळा, पलूस, तासगाव, कवठेमहांकाळ, विटा, आटपाडी, जत ( नऊ तालुके)

सातारा- कोरेगाव, खटाव, माण ( तीन तालुके)

कोल्हापूर- करवीर, राधानगरी, गगनबावडा, आजरा, चंदगड ( पाच तालुके)

छत्रपती संभाजीनगर- छत्रपती संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर, गंगापूर, खुलताबाद, सिल्लोड, फुलंब्री (नऊ तालुके)

जालना- बदनापूर, घनसावंगी, अंबड, जालना, परतूर, मंठा, भोकरदन, जाफ्राबाद ( आठ तालुके)

बीड- बीड, गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी ( ११ तालुके)

लातूर - लातूर, औसा, रेणापूर, निलंगा, शिरुरअनंतपाळ, देवणी, उदगीर, जळकोट, अहमदपूर, चाकूर ( १० तालुके)

धाराशिव- धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर, लोहारा, परांडा, उमरगा ( आठ तालुके)

नांदेड- कंधार, किनवट, मुदखेड, भोकर, अर्धापूर, माहूर, नांदेड, लोहा, मुखेड, देगलूर, बिलोली, धर्माबाद, नायगाव, हदगाव, हिमायतनगर, उमरी ( १६ तालुके)

परभणी- पूर्णा, पालम, परभणी, सोनपेठ, जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी ( नऊ तालुके)

हिंगोली- हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव, वसमत ( पाच तालुके)

बुलढाणा- चिखली, सिंदखेडराजा, देऊळगावराजा, लोणार, शेगाव, मोताळा, बुलढाणा, खामगाव, मेहकर, मलकापूर, जळगाव जामोद ( ११ तालुके)

अमरावती- अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगाव सुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापूर ( १४ तालुके)

अकोला- अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर, बार्शी टाकळी ( सात तालुके)

वाशिम- वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर, कारंजा, मानोरा ( सहा तालुके)

यवतमाळ- पुसद, यवतमाळ, बाभूळगाव, मारेगाव, महागाव, उमरखेड, कळंब, घाटंजी, राळेगाव, दारव्हा, आर्णी, नेर, दिग्रस, पांढरकवडा, वणी, झरी जामणी ( १६ तालुके)

वर्धा- वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, समुद्रपूर, हिंगणघाट, कारंजा, आष्टी ( आठ तालुके)

नागपूर- नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा, उमरेड, कुही, नरखेड ( १३ तालुके)

भंडारा- साकोली, भंडारा, मोहाडी, तुमसर, पवनी, लाखनी, लाखंदूर ( सात तालुके)

गोंदिया- देवरी ( एक तालुका)

चंद्रपूर- चंद्रपूर, भद्रावती, राजूरा, बल्लारपूर, कोरपना, मूल, वरोरा, सावली, चिमूर, नागभिड, सिंदेवाही, पोंभुर्णा, जिवती, ब्रम्हपुरी ( १४ तालुके)

गडचिरोली- गडचिरोली, धानोरा, मूलचेरा, आरमोरी, कुरखेडा, अहेरी, सिरोंचा, भामरागड, एटापली, देसाईगंज (वडसा) (१० तालुके)

**अतिवृष्टी व पुरामुळे अंशतः बाधित तालुके-**

नाशिक - कळवण, देवळा, इगतपुरी (तीन तालुके)

धुळे - धुळे, साक्री, शिंदखेडा (तीन तालुके)

अहिल्यानगर - पारनेर, संगमनेर, अकोले (तीन तालुके)

पुणे - हवेली, इंदापूर (दोन तालुके)

सांगली - कडेगांव (एक तालुका)

सातारा - सातारा, कराड, पाटण, फलटण, जावळी (पाच तालुके)

कोल्हापूर - कागल, शिरोळ, पन्हाळा (तीन तालुके)

बुलढाणा - नांदुरा, संग्रामपूर (दोन तालुके)

गोंदिया - तिरोडा, गोंदिया, गोरेगाव, मोरअर्जुनी, सालेकसा, सडक अर्जुनी, आमगाव (सात तालुके)

गडचिरोली - चारमोशी, कोरची (दोन तालुके)

अंशतः बाधित तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष बाधित मंडळ सवलतीस पात्र असतील.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# बोरीवली ग्रामपंचायतीचा अजब कारभार! चार वर्षांत मागासवर्गीयांसाठीचा १५ टक्के निधी खर्च केलाच नाही!

## समतानगर बौद्ध वस्तीतील नागरिकांचा संताप; माहिती अधिकारातून पत्रकार मिलिंद जाधव यांनी उघड केली माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील बोरीवली ग्राम पंचायतीच्या कामकाजातील मोठा गैरप्रकार माहिती अधिकारातून समोर आला आहे. मागासवर्गीयांसाठी दरवर्षी ग्रामनिधीतून १५ टक्के निधी खर्च करणे बंधनकारक असतानाही, गेल्या चार वर्षांत (एप्रिल २०२२ ते जुलै २०२५) या काळात हा निधी जवळपास खर्चच करण्यात आला नाही, असा खुलासा पत्रकार मिलिंद जाधव यांनी केला आहे. सरकारी नियमानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीने मागासवर्गीय वस्तीतील विकासकामांसाठी १५ टक्के निधी राखून ठेवणे

> **ग्रामपंचायतीने मागासवर्गीयांसाठी असलेला १५ टक्के निधी खर्च केला नाही. त्यामुळे हा निधी २०२५ पूर्वी मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी वापरावा अशी मी मागणी ठाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे 'आपले सरकार' पोर्टलवरून केली आहे.**
>
> **– पत्रकार ,मिलिंद जाधव**

आणि तो खर्च करणे आवश्यक असते. मात्र, बोरीवली ग्रामपंचायतीचे (एप्रिल २०२२ ते जुलै २०२५) या काळात असणारे तसेच सद्या सेवेतून बडतर्फ झालेले ग्रामपंचायत अधिकारी आर .जे . म्हस्के यांच्या बेजबाबदारपणामुळे मागासवर्गीय वस्ती १५ टक्के निधी पासून वंचित राहिली आहे.

२०२२- २०२३ मधी ५ लाखाची तरतूद करण्यात आली होती परंतु कोणतीही रक्कम खर्च करण्यात आलेली नाही. तर २०२३- २०२४ मधी ५ लाखाची तरतूद करण्यात आली मात्र फक्त ३५००० रु . खर्च करण्यात आले आहेत. २०२४-२०२५ मधी ६५०००० लाखाची तरतूद करण्यात आली आहे. मात्र फक्त १७२६३२ रुपये खर्च केलेले आहेत. २०२५- २०२६ पर्यंत ६५०००० लाखाची तरतूद करण्यात आली आहे. त्यात २० जुलै २०२५ पर्यंत कोणतीही रक्कम खर्च करण्यात आलेली दिसून येत नाही. म्हणजेच एकूण २३ लाख रुपयांची तरतूद असून, फक्त २ लाख ७ हजार ६३२ रुपयेच खर्च झाले आहेत. यातीलही १ लाख १२ हजार ६३२ रुपयांच्या पावत्या ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नाहीत, हे अत्यंत गंभीर

> **मागासवर्गीयांसाठीचा १५ टक्के निधी त्यांच्या उन्नतीसाठी वापरलाच पाहिजे होता. पुढील काळात याची पूर्ण खबरदारी घेतली जाईल.**
>
> **– गणेश जाधव (बोरीवली ग्राम पंचायत अधिकारी)**

आहे. बोरीवली ग्रामपंचायतीने मागासवर्गीयांचा निधी न वापरल्यामुळे समतानगर बौद्ध वस्तीतील नागरिकांचा प्रचंड संताप उसळला आहे. गेल्या चार वर्षांपासून आमच्या हक्काचा निधी खर्च केला गेला नाही. आमच्या वस्तीचा विकास थांबवण्यात आला आहे, असा आरोप नागरिकांनी केला आहे. थकित निधी मागासवर्गीयांच्या विकासासाठी त्वरित वापरावा, अशी मागणी पत्रकार मिलिंद जाधव यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.




मागासवर्गीयांसाठीचा १५ टक्के निधी गेल्या चार वर्षांत कुठे गेला? ग्राम पंचायतीने नियम असूनही निधी का वापरला नाही? ठाणे जिल्हा प्रशासन या प्रकरणाची चौकशी करणार का?

बोरीवली ग्रामपंचायत हा थकित निधी मागासवर्गीयांच्या विकासासाठी खर्च करतील का? याकडे समतानगर बौद्ध वस्तीतील नागरिकांचे लक्ष वेधले आहे.

## महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन कृती समिती व तक्षशिला बुद्ध विहार उल्हासनगर यांची जाहिर सभा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी- बाळासाहेब अहिरे



उल्हासनगर -महाबोधी महाविहार बोधगया बिहार येथील महाविहार मुक्तीसाठी वर्षभर देशात अनेक दिवसांपासून आंदोलन सुरू आहे, मुंबई महानगर प्रदेशातील तक्षशिला बुद्ध विहार व अखिल भारतीय बौद्ध समाज यांच्याकडून बौद्ध संघर्ष सभेचं आयोजन करण्यात आले आहे.

या सभेला अनेक आंबेडकरी चळवळीतील नेते कार्यकर्ते व बौद्ध उपासक उपासिका यांनी सभेला तयारीला लागले आहेत, बुधवार दि.१५ ऑक्टोबर २०२५ रोजी सायं ५:०० वाजता , तक्षशिला महाविद्यालय सुभाष टेकडी उल्हासनगर पुर्व कॅम्प ४ येथे सभा होणार आहे या बौद्ध संघर्ष सभेला महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन प्रनेते भंन्ते विनाचार्य व भंन्ते आनंद महाथेरो हे मार्गदर्शन करणार आहेत ,

*बुद्धगया टेम्पल एक्ट १९४९ रद्दबातल

*संपूर्ण महाविहार आणि व्यावस्थापन बौद्धांच्या ताब्यात देण्याची मागणी

* भारतीय संविधानानानूसार नविन बौद्ध एक्ट लागू करावा अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

उल्हासनगर शहरातील अनेक राजकीय नेत्यांनी व विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी या सभेसाठी जय्यत तयारी सुरू केली आहे.

## मनुवादी वकिलाने केलेला हल्ला लोकशाहीला घातक; सरन्यायाधीशांवरील हल्ल्याविरोधात दलित पँथर संघटना रस्त्यावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे प्रतिनिधी/अजिंक्य मस्के

सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असताना एका ७१ वर्षीय वकिलाने सरन्यायाधीशांवर बूट फेकण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर देशासह राज्यभरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, पुण्यात हडपसर मंत्री मार्केट येथे दलित पँथर संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत भाऊ नडगम यांच्या मार्गदर्शनाखाली पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सोमनाथ भाऊ साळवे यांच्या नेतृत्वामध्ये रस्ता रोको व जोडे मारो असे तीव्र आंदोलन छेडण्यात आले आहे.

भारताचे सरन्यायाधीश, महाराष्ट्राचे सुपुत्र, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर चालणारे न्या. बी. आर. गवई यांच्यावर न्यायालयात झालेला हल्ला अत्यंत निंदनीय आहे.







शासन पुरस्कृत धर्मांध शक्तींना मिळालेली मोकळीक आता थेट न्यायपालिकेवर हल्ला करत आहेत. हा हल्ला केवळ एका व्यक्तीवर नसून भारताच्या सामाजिक समतेवर, संविधानावर झालेला हल्ला आहे. याचा निषेध करत दलित पँथर संघटने कडून आंदोलन करण्यात आले आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून धर्मांध शक्तींना बळ देणाऱ्या व संविधानिक मूल्यांना कमकुवत करणाऱ्या सरकारचा, माननीय सरन्यायाधीशांवर हल्ला करणाऱ्या व्यक्तींचा निषेध करत त्या जातीवादी वकिलावरती ट्रॉसिटी क्ट नुसार गुन्हा दाखल व्हावा व देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा नाहीतर दलित पँथर संघटना रस्त्यावर उतरून महाराष्ट्रभर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

या वेळी आंदोलनास सहभागी सोलापूर जिल्हा अध्यक्ष बंडू गवळी, अक्कलकोट सरपंच श्रुती ताईभांगे, उरळी कांचन चे पुणे जिल्हा कार्यध्यक्ष अनिल साळवे, पुणे जिल्हा अध्यक्ष गणेश अग्रवाल, अल्प संख्यक अध्यक्ष बब्बू बागवान, उत्तम पतारी संघटना अध्यक्ष उत्तम खंडागळे, संघटक प्रमुख हीरालाल जी अग्रवाल, सुल्तान भाई बागवान, महिला आघाडी अध्यक्ष पुष्पा ताई अग्रवाल, जनसंपर्क प्रमुख अजिंक्य मस्के पारधी समाज अध्यक्ष अश्विनी ताई पवार, जिल्हा पारधी समाज अध्यक्ष बाबू पवार, उपाध्यक्ष संजय पोटभरे,विशाल ओहळ,उपाध्यक्ष सुनील वारे,अजय वंडगल, युवा नेते कुणाल साठे, पुणे शहर उपाध्यक्ष महादेव कांबळे, पुणे शहर उपाध्यक्ष राहुल(डॉन) कांबळे सुमित गायकवाड बुद्धिस्ट महाराष्ट्र राज्य, फुलचंद चतुर सर, भीमराव बनसोडे, आशिष आल्हाट सरचिटणीस हडपसर विधानसभा, गुड्डू भाई अंसारी, संजू कुमार, सुनील कुमार, सुनील सेठ जैन, संतोष भाऊ शेरकर, सिंग साहब, मंजर भाई सईद, लकी सेट, राहुल सेठ, राम कुमार जायसवाल, जोशी सेठ, शिवा कुमार, भारती गायकवाड,शोभा तोंडकर, मंदा यमहारणे,जया शिंदे,रतना वारे,आईल्हाया गावडे,जनाबाई गायकवाड,अनू पांत्याब,पार्वती गायकवाड,अणिता पालाळ,शाणिबाई जाधव,दिया गायकवाड ,मंगलाबाई चिनचोरे,पार्वती गायकवाड,सविता घाडगे, प्रेम शिंदे,शिवम खरात,विजय सांबू,कबिर बागवान, राजू पठाण, सत्यजित निंबाळकर व आदी दलित पँथर संघटनेचे प्रमुख पदाधिकारी समाजातील अनेक नेते मंडळी मोठया संख्येने उपस्थिती होते.

## सर्वोच्च न्यायालयातील असभ्य घटनेचा कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेतर्फे तीव्र निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भारताचे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर दिनांक ०६ ऑक्टोबर २०२५ रोजी न्यायालयीन कार्यवाहीदरम्यान एका व्यक्तीने 'बूट फेकण्याचा प्रयत्न' केल्याची अत्यंत खेदजनक आणि अशोभनीय घटना घडली. ही घटना केवळ सरन्यायाधीशांच्या व्यक्तिशः सन्मानावरच नव्हे, तर संपूर्ण भारतीय न्यायव्यवस्थेच्या प्रतिष्ठेवर गंभीर आघात करणारी आहे. देशाच्या सर्वोच्च न्यायालयात अशा प्रकारची अमर्याद आणि अपमानास्पद कृती होणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. न्यायालय हे केवळ न्यायदानाचे स्थान नसून, ते संविधानिक मूल्यांचे, विवेकाचे, संयमाचे




आणि संस्कारांचे प्रतीक आहे. त्या मंदिरात झालेला हा अपमान म्हणजे लोकशाहीच्या आणि न्यायसंस्थेच्या आदर्शांवर झालेला थेट प्रहार आहे. यावेळी

या घटनेचा कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेतर्फे तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. संघटनेने सर्व वकील बांधवांनी लाल पट्टी लावून शांततामय निषेध केले. तर यावेळी कल्याण जिल्हा व सत्र न्यायालय परिसरातून सर्व वकील बांधवांनी एकत्र येऊन कल्याण तहसीलदार यांना औपचारिक निवेदन सादर केले.निवेदनाद्वारे शासनाला हे कळविण्यात आले की, अशा प्रकारच्या घटनांमुळे न्यायसंस्थेवरील नागरिकांचा विश्वास डळमळीत होऊ शकतो. त्यामुळे भविष्यात कोणत्याही न्यायमूर्ती, न्यायाधीश किंवा न्यायालयाच्या सन्मानाला धक्का पोहोचेल अशा घटना होऊ नयेत, यासाठी शासनाने तातडीने प्रतिबंधात्मक आणि दंडात्मक उपाययोजना कराव्यात.

यावेळी कल्याण जिल्हा वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश रा. जगताप, उपाध्यक्ष : ॲड. गणेश पाटील सहसचिव ॲड. सुशील धनगर, कार्यकारिणी सदस्य : ॲड. प्रदीप बावस्कर माजी अध्यक्ष : ॲड. राजोळे, ॲड. शंकर रामटेके, ॲड. राजू राम, ॲड. बनसोडे, ॲड. अजिंक्य साळवे, ॲड. दया घोडेराव, ॲड. रुपेश कांबळे, ॲड. संग्राम मोरे, ॲड. महेंद्र आयगोळे, आकाश बोईनवाड, तसेच वरिष्ठ वकील बांधव आणि नवोदित वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलीस मित्र सेवाभावी फाउंडेशनच्या महिला पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पोलीस मित्र सेवाभावी फाउंडेशनच्या सोलापूर जिल्हा महिला अध्यक्षपदी संगीता ताई पवार, तर जिल्हा कार्यकारणी सदस्य पदी मंजुळाताई दोडमिशे यांच्या निवडी राष्ट्रीय अध्यक्ष महेंद्रजी चौधरी साहेब यांच्या नुकत्याच मुंबईतील जाहीर केल्या असून त्यांना आज पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके साहेब यांच्या हस्ते निवड पत्र व ओळखपत्र देण्यात आले यावेळी फाउंडेशन ते सोलापूर जिल्हा अध्यक्ष काकासाहेब बुरांडे समाधान गीते अनिताताई आजबे संगीता कांबळे रेश्मा चांदणे रूपाली पवार आणि महिला उपस्थित होत्या व पवार व दुर्मिसे यांच्या



झालेल्या निवडीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. जनतेसाठी सतत कार्यरत असणाऱ्या पोलीस बांधवास जिथे मातीची गरज भासेल तिथे तिथे मत्तेसाठी आमचा ग्रुप धावून जाईल. असे आश्वासन नूतन पदाधिकाऱ्यांनी दिले.

**१३७ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा**

**बी. बी. मेश्राम यांचे प्रतिपादन**

# नस्तिपक्षाला नाकारून अस्तिपक्षाचा अंगीकार केला पाहिजे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे कार्यालय ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे माझ्या जीवनाचे तात्विक अधिष्ठान. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ७१ व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील प्रासंगिक विषयावर १३७ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा ५ ऑक्टोबर २०२५ ला संपन्न झाली.



फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, जनतेच्या अपेक्षेप्रमाणे जनतेचा आवाज हाच सर्वोच्च असतो, म्हणून त्याचा विचार केला पाहिजे. कुठल्याही व्यक्तीच्या वर्तनावरून त्याने स्वीकारलेले तत्वज्ञान काय असेल? हे सिद्ध होते. अहंकारातून आपली बर्बादी होत असताना सुद्धा माणसे राग, लोभ, मोह, माया, द्वेष आणि मत्सर या षडरिपूचा त्याग करायला तयार नाहीत. हिंदूंनी भगवदगीतेत व्यक्त केल्याप्रमाणे क्रमिक विषमतेवर आधारलेली जातिव्यवस्था स्वीकारल्याने तो त्यांच्या जीवनाचा मूलभूत नियम ठरला आहे. ज्यामुळे मानवतावादाचा ऱ्हास होत चालला आहे. पुनश्च मानवी जीवनाच्या उत्कर्षाकडे वळायचे असल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाच्या तत्त्वज्ञानातून स्वीकारलेल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तत्वाचा आपण अंगीकार केला पाहिजे. अर्थात नस्तिपक्षाला नाकारून अस्तिपक्षाचा स्वीकार केला पाहिजे. परिणामी नकारात्मकेकडून सकारात्मकतेकडे वळून मानवी जीवनाच्या उत्कर्ष करता येईल. परंतु कुठल्याही तत्वाला विशिष्ट मर्यादेत अंगीकारले पाहिजे. ज्यात मानवी जीवनात बंधूभावाला सर्वोच्च स्थान दिले पाहिजे. जेणेकरून त्याचे इतर तत्त्वावर दुष्परिणाम होणार नाहीत. भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेत स्वातंत्र्य, समता व बंधुभाव असा सुचित केलेला रजकीय ध्येयवाद हा सनातन वृत्ती नाकारत असल्या तरी येणाऱ्या काळात भारतीय नागरिकांचा हा सामाजिक ध्येयवाद होईल. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ३ ऑक्टोबर १९५४ रोजी आकाशवाणी दिल्ली केंद्रावरून दिलेल्या भाषणात स्पष्ट केले होते. याची जाणीव ठेवून जनसामान्यांपर्यंत संदेश पोहोचवावा. म्हणून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनने सदरील विषयावर कार्यशाळा आयोजित केली.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते म्हणाले की, जीवनाचे तात्विक अधिष्ठान हे विधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्र चळवळीचे सारांश आहे. समता स्वातंत्र्य बंधुता ही तत्वे त्यांनी बुद्धाच्या तत्त्वज्ञानातून स्वीकारलेली आहेत. भारताचे संविधानात अंतर्भूत मूल्यावर आपण प्रतिबद्ध असायला हवे.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते भारतीय दलित पँथरचे अध्यक्ष लक्ष्मण भुतकर म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीची स्थिती वर्तमानात काय आहे? काय त्यांनी दिलेल्या संदेशाप्रमाणे आपण त्या चालवत आहोत? सर्वांनी एकत्र येऊन आपण त्या पक्ष संघटना चालविल्या पाहिजेत.

याप्रसंगी डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गुरु तथागत बुद्ध, राष्ट्रसंत कबीर व राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांचे विचार आपण स्वीकारले पाहिजेत. विलास कटारे म्हणाले की, सरळ सरळ जग हे प्रतिगामी आणि पुरोगामी अशा दोन गटात विभागलेले आहे. आंदोलनाला कृतिशीलतेची जोड असावी लागते. महाड सत्याग्रहात ब्राह्मणांना सामावून घेऊ नये असे जेधे जवळकरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनंती केली होती. अशोक मेश्राम म्हणाले की, कुठल्याही व्यक्तीचे त्यांनी स्वीकारलेल्या तत्त्वानुसार त्याचे मूल्यमापन होईल. आर्थिक सुबत्ता आली म्हणजे सामाजिक परिवर्तन होईलच असे नाही. सोशल इंजिनिअरिंग च्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात शिरकाव केला पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून फाउंडेशन च्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके तर प्रास्ताविक उद्योजक मिलिंद बागुल व आभार अशोक मेश्राम यांनी व्यक्त केले.

या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, ॲड. विलास रामटेके, डॉ. व्ही. एच. कांबळे, उद्योजक मिलिंद बागुल, अशोक मेश्राम, विलास कटारे, प्रतीक पंचशील, लक्ष्मण भुतकर, अशोक मिसाळ इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.



# डीपीडीसीची निधी सर्व लोकप्रतिनिधींना समसमान पद्धतीने वाटप करण्याची मागणी

## खासदार प्रणिती शिंदे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांची घेतली भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आज नियोजन भवन, सोलापूर येथे सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी शिष्टमंडळात सोबत सोलापूरचे पालकमंत्री ना. जयकुमार गोरे यांची भेट घेऊन DPDC ( जिल्हा नियोजन समिती) निधीचे वाटप सर्व लोकप्रतिनिधींना समसमान आणि पारदर्शक पद्धतीने व्हावे अशी मागणी केली.

खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की DPDC निधीमध्ये कोणत्याही प्रकारच अनिमितता व पक्षीय भेद होऊ नये. मागील NCAP निधीच्या वाटपात तपावत दिसून आली होती. जात विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधींना जाणून बुजून डावल्याचे स्पष्टपणे दिसते. अशीच परिस्थिती डी पी डी सी मध्ये होऊ नये निधी देणे हे आमच्यावर नव्हे तर जनतेवर अन्याय आहे आपण सर्व लोकप्रतिनिधी आपल्या मतदारसंघातील लोकांच्या विकासासाठी निधी मागतो जर निधी वाटपात पक्ष भेदभाव झाला तर सोलापूरच्या जनतेवर अन्याय ठरेल त्यामुळे पालकमंत्र्यांनी ही बाब संवेदनशीलतेने घेऊन नगरपालिका, जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत स्तरावर समसमान निधी वाटप व्हावे अशी मागणी त्यांनी केली.

याप्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले की डीपीसी निधी वाटप करताना कुठलाही पक्षी आहे तुझा भाऊ केला जाणार नाही. विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधी नाह योग्य त्या प्रमाणात निधी दिला जाईल. डीपीडीसी चे वितरण प्रक्रिया नियमितपणे सुरू आहे. अशी ग्वाही त्यांनी खासदार पणती शिंदे यांना व शिष्टमंडळांना दिली.

याप्रसंगी सोलापूर शहर व काँग्रेसचे अध्यक्ष चेतन भाऊ नरोटे, माझी महापौर संजय हेमगिडी, अरिफ शेख अलकाताई राठोड, प्रवीण निकाळजे, विनोद भोसले, परविन इनामदार, अनुराधा काटकर, मनोज वेलगुलवार हनुमंत सायबोलू, सुशील बंदपट्टे, गणेश डोंगरे, प्रमिला तूप लोंढे, जुबेर कुरेशी, जहीर विजापुरे, तिरुपती परकीम पंडाल, भीमाशंकर टेकाळे, देवा भाऊ गायकवाड, युवराज जाधव, बाबुराव म्हेत्रे, नागनाथ कदम, उदय चाकोते, अब्दुल खतीब, मुल्ला रुपेश गायकवाड, सुभाष वाघमारे, हेमाताई चिंचोलीकर, सुमन जाधव, रेखा बिनेकर, मल्लेश सुरवसे आधी जन उपस्थित होते.

# सोलापूर येथे जिल्हाधिकारी आणि अन्न आणि औषध विभागाला निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : दसरा व दीपावली सणात मिठाई, पेढे, बर्फी, गुलाबजामून, कुंदा, बासुंदी यांसारख्या गोड पदार्थांची मोठ्या प्रमाणावर मागणी असते. या पदार्थांचा मुख्य कच्चा माल म्हणजे खवा असून, या काळात त्याची मागणी प्रचंड वाढते. वाढत्या मागणीचा गैरफायदा घेत अनेक ठिकाणी खव्यामध्ये भेसळ केली जाते. ही भेसळ आरोग्यासाठी घातक ठरत असल्याने तातडीने कार्यवाही करण्याची मागणी सुराज्य अभियानाच्या वतीने जिल्हाधिकारी आणि अन्न आणि औषध विभाग यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

### खव्यामधील भेसळ रोखण्याची 'सुराज्य अभियान'ची मागणी

निवेदनातील प्रमुख मागण्या :

१. जिल्ह्यातील मिठाई विक्रेते व कारखान्यांवर अचानक तपासणी मोहीम राबवावी. खवा व गोड पदार्थांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवून अहवाल सार्वजनिक करावा. भेसळ आढळल्यास संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करून त्यांचे परवाने रद्द करावेत.

२. नागरिकांना सजग करण्यासाठी प्रसारमाध्यमे व पत्रकांद्वारे जनजागृती मोहीम राबवावी.

३. बाजारपेठेत नमुना चाचणी केंद्रे (Testing Booths) उभारावीत.



**या विषयांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी श्री अभिजित पाटील यांना दिले. त्या वेळी उद्योजक श्री किशोर पुकाळे, श्री सागर बापट आणि सुराज्य अभियान चे श्री दत्तात्रय पिसे उपस्थित होते.**

**– श्री. दत्तात्रय पिसे,**
**सुराज्य अभियान, सोलापूर.**
**संपर्क – ९९२२६६४४६६**

# योगविद्या आत्मसात करा शरीर तंदुरुस्त निरोगी होईल : चंद्रकांत बिराजदार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : माहिती आणि तंत्रज्ञानामुळे जग झपाट्याने बदलत आहे संगणक व मोबाईलमुळे शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी मैदानी खेळापासून दूर गेले आहेत. अशा स्थितीत विद्यार्थ्यांनी योग विद्या आत्मसात करून शरीर तंदुरुस्त व निरोगी ठेवले पाहिजे असे प्रतिपादन योगशिक्षक चंद्रकांत बिराजदार यांनी व्यक्त केले.



महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील क्रीडा विभागाने आयोजित केलेल्या योग विद्या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी प्रा मनीषा शिंदे उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, शरीर तंदुरुस्त असावे म्हणून सकस आहाराबरोबर दररोज सकाळी नियमित योग साधना देखील केली पाहिजे, त्यासाठी योग विद्या आत्मसात करणे गरजेचे आहे.

### कल्याणशेट्टी महाविद्यालयात योगविद्या कार्यशाळा

योगविद्या कार्यशाळेतील विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, संचालिका शामवीताई कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, जुनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी इंग्लिश विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी अभिनंदन केले आहे.

### कार्यशाळेत योग विद्येची प्रात्यक्षिके

**क्रीडा विभागाने आयोजित केलेल्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांकडून पद्मासन, वज्रासन, पश्चिमोत्तानासन, अर्धमच्छेंद्रासन, हलासन, पवनमुक्ताआसन, भुजंगासन, धनुरासन, ताडासन, वृक्षासन आदींची प्रात्यक्षिके घेण्यात आली.**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ शितल झिंगाडे-भस्मे यांनी केले आभार प्रा जनाबाई चौधरी यांनी मानले.

# तांबड्या मातीत रांगडे खेळाडू तयार करणारा खेळ म्हणून आज कुस्ती या खेळाकडे पाहिले जाते : माजी मंत्री मधुकरराव चव्हाण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के. गायकवाड): तांबड्या मातीत रांगडे खेळाडू तयार करणारा खेळ म्हणून कुस्ती या खेळाकडे पाहिले जाते. कालांतराने महाविद्यालय स्तरावर बदल होऊन मातीतील कुस्तीची जागा मॅटने घेतल्या मुळे महाविद्यालयीन स्तरावर देखील चांगले कुस्ती पटू तयार होत आहेत असे मत बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी व्यक्त केले.

नळदुर्ग येथील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि ११ ते १३ ऑक्टोबर २०२५ दरम्यान नळदुर्ग येथील महाविद्यालयात मुलांमुलींच्या कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन बालाघाट शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा विभागाच्या पदवीधर मतदार संघाचे आमदार सतीश चव्हाण तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठ विभागाचे क्रिडा संचालक डॉ. सचिन देशमुख, महाराष्ट्र राज्य ऑलंपिक संघटना उपाध्यक्ष डॉ चंद्रजित जाधव, शिवछत्रपती पुरस्कार विजेती कु गौरी शिंदे ,डॉ. सचिन सलामपुरे हे उपस्थित होते . या कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण व प्रतिमा पुंजनाने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष राठोड कार्यालय अधिक्षक धनंजय पाटील, डॉ अशोक कदम, डॉ. शिवाजी घोडके , डॉ. हंसराज जाधव यांनी केले. याप्रसंगी पुढे बोलताना माजी मंत्री मधुकरराव चव्हाण म्हणाले कि , ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे यासाठी प्रतिवर्षी आम्ही विद्यापीठ स्तरावरील वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करत असतो यावेळी आम्ही मुलांमुलींच्या कुस्ती स्पर्धा घेण्याचे आयोजन केले यामागील प्रमुख उद्देश म्हणजे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना खेळाकडे आकर्षित करणे हा आहे. अश्या स्पर्धेच्या माध्यमातूनच आमच्या महाविद्यालयात चांगल्या दर्जाचे खेळाडू तयार झाले व त्यांनी आमच्या महाविद्यालयाचे नाव राज्य व राष्ट्रीय पातळीवर विविध खेळांच्या माध्यमातून झळकावून महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवला.



या कार्यक्रमास बालाघाट शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष रामचंद्र आलुरे, उपाध्यक्ष डॉ अभय शहापूरकर, संचालक बाबुराव चव्हाण, कोषाध्यक्ष अँड.प्रदिप मंटगे, सहसचिव शहबाज काझी, लिंबराज कोरेकर, जेष्ट कुस्ती पटू महादेवप्पा आलुरे, मैनोद्दीन शेख,नळदुर्ग येथील माजी नगरसेवक विनायक अहंकारी, नवाज काजी, सुधीर हजारे, इमाम शेख, सामाजिक कार्यकर्ते अझहर जहागिरदार, सौ सुभद्राताई मुळे, सौ कल्पना गायकवाड, शिवसेनेचे तालुका उपाध्यक्ष सरदारसिंग ठाकूर, शहर अध्यक्ष संतोष पुदाले , डॉ अंकुश कदम, प्रा. संभाजी भोसले प्राचार्य डॉ रामदास ढोकळे, प्राचार्य डॉ संजय कोरेकर, प्राचार्य डॉ मोहन बाबरे, पत्रकार विलास येडगे, सुहास येडगे, तानाजी जाधव, शिवाजी नाईक, सुनील बनसोडे, भगवंत सुरवसे, लतीफ शेख, उत्तम बनजगोळे, आयुब शेख, सतीश राठोड , दादा बनसोडे , शिवाजी व्हाडे, अणदूरचे माजी सरपंच धनराज मुळे, प्रभाकर मुळे, शरणप्पा कबाडे, अमर नरवडे, सुंदर जवळगे, मार्तंड मोकाशे, दिपक घोडके, महादेव मुळे यांच्यासह गावातील व परिसरातील कुस्तीचे जाणकार गावातील नागरीक व महाविद्यालयीन कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विघापीठ अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज नाईट कॉलेजच्या यशात अनखीन एक रोवला मानाचा तुरा**

# बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक विजेता प्रबुद्धपाल बनसोडे व महेश गायकवाड यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापिठा अंतर्गत घेण्यात आलेल्या महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा २०२५ ही स्पर्धा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापिठा अंतर्गत भरवली गेली होती . छत्रपती शिवाजी महाराज नाईट कॉलेजला शिक्षण घेत आसलेल्या सुवर्णपदक विजेता प्रबुद्धपाल दादासाहेब बनसोडे व महेश मल्हारी गायकवाड

हे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज नाईट कॉलेज मार्फत झालेली बॉक्सिंग स्पर्धा बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय अनगर येथे संपन्न करण्यात आली या तिन मोठ्या राऊंड मध्ये प्रबुध्दपाल दादासाहेब बनसोडे व महेश मल्हारी गायकवाड दोघांनी समोरच्या स्पर्धकावर मात करून महाविद्यालयीन स्पर्धे मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज नाईट कॉलेजच्या यशात एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. यावेळी छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजचे संस्थापक मनोहर पंथ सपाटे, प्राचार्य मित्रगोत्री , शारीरीक शिक्षण संचालक संतोष गवळी , बॉक्सिंग कोच प्रा सोहेल पठाण आदींनी सत्कार व गौरव केला.

या यशा मुळे सर्वत्र अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे .



# मृत्यूनंतर होणारे हाल आता संपणार; स्मशानभूमी समिती घेणार आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : मुंबई / सोलापूर : राज्यातील हजारो गावांमध्ये आजही कायमस्वरूपी स्मशानभूमी नसणे, त्यामुळे शेतशिवारात, पडीक जमिनीवर केले जाणारे अंत्यसंस्कार आणि त्यातून बरेचदा निर्माण होणारे सामाजिक ताणतणाव यांची दखल अखेर राज्य शासनाने घेतली आहे. त्यामुळे मृत्यूनंतरही होणारे हाल संपण्याची आशा निर्माण झाली आहे. स्वातंत्र्याच्या ७८ वर्षानंतरही अनेक गावांमध्ये स्मशानभूमी नाही. त्यामुळे अंत्यसंस्कारात अनेक अडचणी येतात. काही समाजांनी खासगी जमीन खरेदी करून आपापल्या समाजबांधवांच्या अंत्यसंस्कारांची सोय केली आहे. काही गावांमध्ये सरकारी मालकीच्या जमिनींवर वर्षानुवर्षे अंत्यसंस्कार केले जातात. अनेक गावांमध्ये हिंदू, मुस्लिमांसाठी वेगवेगळ्या स्मशानभूमी नाहीत. मृत्यूनंतरही जातीपातीची भावना संपत नाही याचा विदारक अनुभव येतो.



**समितीवर सोलापूर जिल्हातून अश्विनी चव्हाण**

**जाती–जातीत संघर्ष, मृतदेह नेला जातो पोलिस ठाण्यात**

मागासवर्गीय समाजातील व्यक्तीच्या निधनानंतर गावात अंत्यसंस्कारासाठी वापरल्या जाणाऱ्या जागेवर त्यांना अंत्यसंस्कार करू देण्यास मनाई केली जाते. एखाद्या गावात स्थायी स्वरूपाची स्मशानभूमी असली तरी विशिष्ट समाजाबांधवांना तेथे अंत्यसंस्कार करण्यापासून रोखले जाते. त्यातून मग जातीजातींमध्ये संघर्ष उभा राहतो. मृताचे नातेवाइक मृतदेह घेऊन थेट पोलिस ठाण्यात पोहोचले अशा घटनाही यापूर्वी बऱ्याच ठिकाणी घडल्या आहेत.

**मंत्री गोरे यांच्या अध्यक्षतेत नेमण्यात आली समिती**

स्मशानभूमीचा अभाव व जातीय तणाव याची दखल घेत ग्रामविकास विभागाने एक समिती शुक्रवारी स्थापन केली. समिती ग्रामीण भागातील स्थितीचा अभ्यास करेल. ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे हे समितीचे अध्यक्ष असतील. सदस्यांमध्ये अभिमन्यू पवार, देवेंद्र कोठे, अमित गोरखे हे तीन आमदार, मनीष मेश्राम नागपूर, अशोक राणे बुलढाणा, ऋषिकेश सकनूर परभणी, गुरुप्रीतसिंग अहलुवालिया, अश्विनी चव्हाण सोलापूर, जयवंत तांबे मुंबई हे आहेत. स्मशानभूमींबाबत उपाययोजना, हिंदू दहनभूमी, दफनभूमीवर स्वतंत्र अभ्यास, गावातील सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी हिंदू स्मशानभूमी सर्व जातींना खुल्या करण्याबाबत आढावा घेऊन उपाययोजना सुचविणे ही समितीची कार्यकक्षा असेल.